# बृहन्मुंबई महानगरपालिका

## बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय आणि टो.रा. वैद्यकिय महाविद्यालय

डॉ.ए.एल. नायर रोड मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८.

क्र.टीईडी/ 1613

15/09/2022

## अधिसूचना

**टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयातील बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी)**

**(B.Sc. in Paramedical Technology) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.**

संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र DMER-11011/31/2022-CETIT दिनांक 13.09.2022 अन्वये सन 2022-23 या शैक्षणिक वर्षाकरीता बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) या अभ्यासक्रमाचे प्रवेश इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) ची एच.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण ही पात्रता ठेवून संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रीया राबविण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) च्या प्रवेशाकरीता आवश्यक असणारी पात्रता -**

1. उमेदवाराकडे भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक आहे.
2. उमेदवाराचा जन्म 31 डिसेंबर, 2005 पूर्वी झालेला असावा.
3. उमेदवाराने 10 वी आणि 12 वी इयत्ता महाराष्ट्र राज्यातील संस्थांमधून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
4. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.
5. उमेदवाराने इयत्ता 12 वी (विज्ञान शाखा) ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झालेला असावा.
6. उमेदवार 12 वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण असल्यास उदा. Medical Lab Technician-1 , Medical Lab Technician-2, Medical Lab Technician-3 हे विषय घेवून उत्तीर्ण झाला असल्यास त्याला त्याच्या विषायासंबंधी बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बी.पी.एम.टी.) अभ्यासक्रमास पात्र ठरवावे.

**बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रीया तक्ता खालील प्रमाणे**

| अ.क्र | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1. | उमेदवारांनी व्यक्तीशः त्यांना सदर महाविद्यालयात प्रवेशासाठी आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतींसह अर्ज करावयाचा कालावधी. | 27/09/2022 ते 07/10/2022 (दि. 01.10.2022, 02.10.2022 व दि. 05.10.2022 वगळून) |
| 2. | महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अर्जामधून तात्पुरती गुणवत्ता यादी व तात्पुरती निवड यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्याचा दिनांक. | 18/10/2022 |
| 3. | निवड यादीमध्ये निवड करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांना महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा कालावधी. | 18/10/2022 ते 21/10/2022 |
| 4. | **बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) मध्ये पात्र उमेदवारांना अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक 21/10/2022 असून त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास दिनांक 28/10/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता शिक्षण उपविभाग येथे MOP-UP Round घेण्यात येईल.** | |

**MOP-UP Round करीता सूचना -**

दिनांक 28/10/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता शिक्षण उपविभाग, पहिला मजला, टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008 येथे MOP-UP Round घेण्यात येईल. MOP-UP Round करीता उमेदवाराने स्वतः व्यक्तीशः उपस्थित असणे बंधनकारक आहे. MOP-UP Round करीता उमेदवाराच्या वतीने इतर कोणीही अन्य उपस्थित राहिल्यास संबंधीत उमेदवाराचा MOP-UP Round करीता विचार केला जाणार नाही. MOP-UP Round मध्ये निवड झालेल्या उमेदवारांकडे सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याकरीता आवश्यक असणारे सर्व मूळ प्रमाणपत्रे व शैक्षणिक शुल्क असणे बंधनकारक आहे.

**बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) विषय निहाय जागांची संख्या -**

1. बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (रेडिओग्राफी) एकूण ०८ जागा
2. बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (कार्डिओलॉजी) एकूण ०३ जागा
3. बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (न्युरोलॉजी) एकूण ०३ जागा
4. बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (ऑपरेशन थेटर) एकूण ०८ जागा
5. बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (परफयुशन टेक्नीशियन) एकूण ०३ जागा

बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याकरीता महाविद्यालयीन वसतीगृह उपलब्ध नाही.

बी.एस्सी इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (B.Sc in Paramedical Technology) च्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी अर्जासोबत पुढील प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तसेच गुणवत्ता यादीनुसार उमेदवाराची सदर अभ्यासक्रमास निवड झाल्यास प्रवेश घेतेवेळी सर्व मुळ प्रमाणपत्र व छायांकीत प्रती तसेच शैक्षणिक शुल्क उमेदवाराकडे असणे अत्यावश्यक आहे.

**Required Documents are as follows :**

1. **S.S.C. Marksheet & Passing Certificate (Compulsory to all Category Candidates).**
2. **H.S.C. Marksheet & Passing Certificate (Compulsory to all Category Candidates).**
3. **H.S.C. College Leaving Certificate (Compulsory to all Category Candidates).**
4. **Caste Certificate & Caste validity (Compulsory to all Category Candidates Except OPEN Category Candidates).**
5. **Non-Creamy Layer Certificate (Compulsory to all Category Candidates Except SC, ST & OPEN Category Candidates).**
6. **Domicile Certificate of Maharashtra State Only (Compulsory to all Category Candidates).**
7. **Aadhar Card (Compulsory to all Category Candidates).**

15/9/22

अधिष्ठाता

टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय